अन्वेषण, चौकशी किंवा फौजदारी गुन्ह्याबाबतचा खटला प्रलंबित असलेल्या निलंबित शासकीय सेवकांच्या प्रकरणाचा आढावा.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय, क्रमांक सीडीआर -१४९६/प्र.क्र.६/०६/११-अ
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक : २० जुलै, २००६

वाचा :-१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर -१३९३/प्र.क्र.७२/११-अ दिनांक १४ डिसेंबर, १९९५.

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्रमांक सीडीआर-१३९६/प्र.क्र. २२/११-अ, दिनांक १४ जून, १९९६.

## शासन निर्णय

देशद्रोही मालमत्ता, नैतिक अध:पतन, खून, खुनाचा प्रयत्न, बलात्कार अशा अत्यंत गंभीर प्रकरणांमध्ये जेव्हा शासकीय सेवकास निलंबित केले जाते, तसेच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रचलेल्या सापळयामध्ये शासकीय सेवक जेव्हा मुद्देमालासह प्रत्यक्ष लाच घेताना सापडतो व त्यामुळे त्याला निलंबित केले जाते. अशा प्रकरणांमध्ये शासकीय सेवकाविरुध्दचे न्यायालयातील फौजदारी प्रकरण पूर्ण होऊन अंतिम निर्णय लागेपर्यन्त त्यास सर्वसाधारणपणे निलंबितच ठेवण्यात यावे, अशा निलंबनाधीन शासकीय सेवकास अंतिम निर्णयाच्या आधीच शासन सेवेत पुन:स्थापित केल्यास कार्यालयीन शिस्तीचा भंग होईल व शासनाच्या भ्रष्टाचाराची पाळेमुळे खणून काढण्याच्या धोरणास धक्का पोहोचेल. यास्तव अशा प्रकरणामध्ये शासकीय सेवकाचे निलंबन संपुष्टात न आणता त्याच्या विरुध्द न्यायालयीन प्रकरणामधील अंतिम निर्णयाची वाट पहावी अशी तरतूद शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४ डिसेंबर,१९९५ मध्ये करण्यात आलेली आहे. वरील अत्यंत गंभीर प्रकरणांमध्ये निलंबित केलेल्या शासकीय सेवकाच्या निलंबनाचा कालावधी अतिशय दीर्घ असेल तर अत्यंत अपवादात्मक परिस्थितीमध्ये ज्या शासकीय सेवकांचे शासन हे शिस्तभंग विषयक, प्राधिकारी आहे, अशा प्रकरणांचा आढावा आस्थापना मंडळ क्रमांक- १ मार्फत मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेने आणि ज्या प्रकरणामध्ये शासनाव्यतिरिक्त अन्य शिस्तभंगविषयक प्राधिकारी असेल त्यांच्याबाबतीत संबंधित प्रशासकीय विभागाच्या मान्यतेने आढाव्याअंती निर्णय घेण्याच्या तरतुदी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १४ जून, १९९६ मध्ये करण्यात आलेल्या आहेत.

अधिकारी कार्यालय
1688
14 AUG 2006

२.    वरील शासन निर्णयात नमूद केलेल्या गंभीर प्रकरणांमध्ये निलंबित केलेल्या शासकीय सेवकांच्या प्रकरणांचा आढावा घेण्यासाठी "गंभीर प्रकरण", "निलंबनाचा अतिशय दीर्घ कालावधी" आणि "अत्यंत अपवादात्मक परिस्थिती" याबाबत सुस्पष्टता नाही. यास्तव निलंबनाच्या प्रकरणांचे वर्गीकरण करुन आढावा घेण्यासाठी खालीलप्रमाणे कालमर्यादा विहित करण्यात येत आहे:-

| | |
|---|---|
| अ) गंभीर किंवा इतर फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हा तपासाधीन असून शासकीय सेवक अटकेत आहे. | अटकेच्या कालावधीत संबंधीत शासकीय सेवकांचे निलंबन चालू राहील.कारण अटकेमुळे सेवक कामावर उपस्थित राहू शकण्याच्या परिस्थितीत नसतो. |
| ब) गंभीर स्वरुपाचा फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आला तसेच तो तपासाधीन आहे, परंतु त्यात शासकीय सेवकास अटक करण्यात आलेली नाही . | निलंबनाचा आढावा निलंबन दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर घ्यावा आणि प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार शासकीय सेवकास पुनःस्थापित करण्याचा निर्णय घ्यावा. दोन वर्षांच्या कालावधीत तपासयंत्रणेने तपास का पूर्ण होऊ शकला नाही. याबाबतीत योग्य समर्थन दिल्याशिवाय शासकीय सेवकास निलंबनाखाली ठेवू नये. परंतु तपास पूर्ण होऊन अभियोगपत्र दाखल झाल्यावर, त्या सेवकास पुन्हा निलंबित करावे किंवा कसे याबाबत जाणीवपूर्वक निर्णय घ्यावा. अशा प्रकरणी निर्णय घेताना गुणवत्ता ही गुन्हा आणि त्याची गंभीर स्वरुपाची पार्श्वभूमी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील तरतुदी आणि पुरावे गंभीरपणे तपासून ठरविण्यात यावी. |
| क) गंभीर स्वरुपाचा फौजदारीगुन्हा नोंदविण्यात आला आहे. तपास पूर्ण झालेला आहे. आणि तपासी यंत्रणेने खटला दाखल करण्यास परवानगी मागण्याचा प्रस्ताव सादर केला आहे. | अभियोग दाखल करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येईपर्यन्त निलंबन चालू ठेवण्यात यावे. कारण प्रस्तावाच्या प्रलंबनाचा फायदा शासकीय सेवकास देणे योग्य नाही. |
| ड) गंभीर स्वरुपाचा फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तपास पूर्ण झालेला आहे आणि खटला दाखल करण्यास परवानगी देखील देण्यात आलेली आहे किंवा अशा प्रकारची परवानगीची आवश्यकता नाही. | फौजदारी खटल्याचा निकाल लागेपर्यन्त निलंबन चालू ठेवावे. कारण शासकीय सेवकाविरुध्द गंभीर स्वरुपाच्या फौजदारी गुन्ह्यासंबंधी पुरावे आहेत असे सकृतदर्शनी सिध्द झालेले आहे. तथापि, शासकीय सेवकास या गुन्ह्यातून दोषमुक्त करण्यात आले असेल, अशा शासकीय सेवकाविरुध्द जरी न्यायालयात अपील, पुनर्विलोकन अथवा पुनरिक्षण दाखल करण्यात आले असले तरी त्यास निलंबनाधीन ठेवण्यात येऊ नये. कारण संबंधित सेवक दोषी असल्याची धारणा त्याच्या दोषमुक्तीमुळे शिल्लक रहात नाही. |
| इ) गंभीर नसलेला फौजदारी गुन्हा नोंद झालेला आहे. तपास सुरु आहे किंवा तपास पूर्ण झालेला असून खटला दाखल करण्यास परवानगी देण्यासंबंधीचा प्रस्ताव सादर झालेला आहे. परंतु तो प्रलंबित आहे किंवा खटला दाखल करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे किंवा अशा प्रकारच्या परवानगीची आवश्यकता नाही. | निलंबनाचा आढावा एक वर्षानंतर घ्यावा आणि पुनःस्थापित करण्याबाबतचा निर्णय हा प्रकरणपरत्वे गुणवत्तेनुसार घेण्यात यावा. |

| | |
|---|---|
| फ) जेथे फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आलेला नाही परंतु गैरवर्तणुकीच्या कारणास्तव शासकीय सेवकास ( विभागीय चौकशी सुरु केलेली असेल अथवा नसेल ) निलंबित केलेले असल्यास. | निलंबनाचा आढावा ६ महिन्यानंतर घ्यावा.पुनःस्थापित करण्याबाबतचा निर्णय प्रकरणपरत्वे गुणवत्तेनुसार घ्यावा. |
| ग) जेथे फौजदारी गुन्हा नोंदविण्यात आला नाही परंतु गैरशिस्तीच्या कारणास्तव शासकीय सेवकास निलंबित केलेले असेल आणि त्यानंतर विभागीय चौकशी सुरु करु नये, असे ठरविण्यात आले असल्यास. | विभागीय चौकशी न करण्याचा निर्णय ज्यावेळी घेतला जाईल त्यावेळी संबंधिताचे निलंबन तात्काळ रद्द करण्यात यावे. |

३. वरील प्रयोजनासाठी, सिध्द झाल्यास, ज्या गुन्ह्यासाठी ३ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीकरीता तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते, असा दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा हा "गंभीर स्वरुपाचा फौजदारी गुन्हा " समजण्यात यावा.

४. शासकीय सेवकांच्या निलंबनाच्या प्रकरणांचे वर नमूद केलेले वर्गीकरण व त्याअनुषंगाने आढावा घेण्यासाठी विहित केलेल्या कालमर्यादेनुसार ज्या प्रकरणात 'शासन' हे शिस्तभंग विषयक प्राधिकारी असेल अशा बाबतीत वरील 'अ' ते 'इ' येथील वर्गीकृत प्रकरणे आस्थापना मंडळ क्र.१ समोर सादर करावीत. ज्या प्रकरणामध्ये शासनाव्यतिरिक्त अन्य शिस्तभंगविषयक प्राधिकारी असेल त्या बाबतीत संबंधित प्रशासकीय विभागाच्या सहमतीने उचित निर्णय घ्यावा. तसेच, वरील 'फ' ते 'ग' येथील वर्गीकृत प्रकरणांच्या बाबतीत म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ मधील तरतुदी विचारात घेऊन सक्षम प्राधिकाऱ्याने योग्य तो निर्णय घ्यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०७२०११५६५४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( भि. रा. गाडवे )
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव व स्वीय सहायक,
मुख्य सचिव / सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव मंत्रालयीन विभाग
* प्रबंधक, उच्च न्यायालय ( मूळ शाखा ), मुंबई
* प्रबंधक, उच्च न्यायालय ( अपील शाखा ), मुंबई
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख / प्रादेशिक विभागप्रमुख
निवड नस्ती.

पृष्ठांनं